# एम्. एड्. एम्. फिल्. समारोप समारंभ










# विविध कार्यशाळा

Workshop on use of SPSS in Research

Workshop on Research Paper writing










तसेच श्रीमती मनिषा चौधरी यांचे स्वागत अंजली फडणविस (एम.एड्. प्रशिक्षणार्थी) यांनी केले. तसेच अश्विनी पवार (एम.एड्. प्रशिक्षणार्थी) यांनी स्वागत गीत सादर केले. तसेच कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. सुहास पाठक यांनी केले. यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मा. श्री. विष्णु पादानंद स्वामी यांनी उपस्थितांना स्वामी विवेकानंदांवर प्रभावी व सखोल असे व्याख्यान दिले. मनिषा चौधरी यांनी भूगोल दिनानिमित्त पर्यावरण जाणिवेवरील कार्यक्रम सादर केला. श्री. गुट्टे हनुमंत यांनी मकर संक्रमणाची संकल्पना ppt च्या आधारे स्पष्ट केली. याप्रसंगी विभागप्रमुख डॉ. शोभना जोशी यांनी सर्वांना तिळगुळाचे वाटप केले व मकर संक्रांतीचे भौगोलिक व सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट केले तसेच नामविस्ताराची माहिती दिली.

## State level Workshop on Use of Computer in Research

1. **Use of SPSS in Research**

दि. २४/०३/२०१५ कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाचे डॉ. एस.एल सनान्से यांनी पहिल्या सत्रात संशोधनात एसपीएसएस पॅकेजचा वापर कसा करावा हे सांगितले. त्यानंतर दुपारच्या सत्रात प्रत्यक्ष संगणकाच्या मदतीने संख्याशास्त्रातील उदाहरणे कशी सोडवता येतील याचे प्रात्याक्षिके करवून घेतले आणि विद्यार्थ्यांकडून संगणकाच्या मदतीने **एस.पी.एस.एस.** पॅकेजचा वापर करून संख्याशास्त्रातील सांख्यिकीय विश्लेषण कशा प्रकारे करावे याचे प्रात्याक्षिकांसह मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडूनही सांख्यिकीय विश्लेषणाचे प्रात्याक्षिक करवून उदाहरणे सोडवून घेतली. त्यामुळे विद्यार्थ्यांना लवकर आकलन होण्यास मदत झाली. विभागप्रमुख डॉ. शोभना जोशी यांनी अध्यक्षीय समारोप केला.

2. **Research Paper Writing -**

दि. २५/३/२०१५ रोजी विभागात राज्यस्तरीय Research Paper Writing कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस शिवाजी विद्यापीठातील विभागप्रमुख डॉ. पद्मिनी या हजर होत्या. संशोधनात्मक पेपर कसा लिहावा यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

## क्रीडा दिन - २० मार्च २०१५

शिक्षणशास्त्र विभागात क्रीडा दिन २० मार्च २०१५ रोजी साजरा करण्यात आला. या दिवशी इनडोअर आणि आऊटडोअर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठातील शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या मैदानावर क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. मुलांच्या व मुलींच्या १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेपासून खेळाचा शुभारंभ करण्यात आला. या खेळात एम.फिल्. आणि एम.एड्. मधील प्रशिक्षणार्थ्यांनी उत्साहपूर्वक व हिरीरीने सहभाग घेतला. नंतर थाळी फेक, गोळा फेक, भाला फेक या खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

इनडोअर स्पर्धेसाठी शिक्षणशास्त्र विभागात बुध्दीबळ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व क्रीडा स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे आयोजन डॉ. एस. व्ही. जोशी विभाग प्रमुख आणि डॉ. प्रशांत पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. शारीरिक शिक्षण विभागातील शिक्षक व प्रशिक्षक यांनी स्पर्धेचे परीक्षण करुन सहकार्य केले. स्पोर्टस् डे यशस्वीरीत्या पार पडला.